## थोडक्यात...

### मधुमित्र मधुसखी पुरस्कारासाठी ४ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी-** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने सन २०२६ साठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकने मागविण्यात आली आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी तसेच मधपाळांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. मधमाशीपालन क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत असलेल्या यशस्वी मधपाळांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यापैकी एक पुरस्कार महिला मधपाळासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. पुरस्कारांची रक्कम अनुक्रमे प्रथम ११ हजार रुपये, द्वितीय ७ हजार रुपये व तृतीय ५ हजार रुपये अशी आहे. २० मे २०२६ रोजी 'जागतिक मधमाशी दिना'निमित्त पुणे येथे आयोजित समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. नामांकनासाठी आवश्यक अर्ज व अधिक माहिती मंडळाच्या .. या संकेतस्थळावर उपलब्ध असून, प्रत्येक जिल्ह्यातील खादी मंडळाच्या कार्यालयातही अर्ज मिळू शकतात. इच्छुकांनी आपली नामांकने ४ मे २०२६ पूर्वी संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन जिल्हा ग्रामोउद्योग अधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा कार्यालय (दूरध्वनी : ०२४५२-२२०४१०) तसेच संचालक, मध संचालनालय, महाबळेश्वर (दूरध्वनी : ०२१६८-२६०२०४) यांच्याशी संपर्क साधावा.

### फार्मर आयडी नोंदणीसाठी २० मे पर्यंत मुदत; शेतकऱ्यांनी फार्मर आयडी प्राधान्याने काढावी

**परभणी-** राज्यात ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी १४ नोव्हेंबर २०२४ पासून सुरू करण्यात आली असून, १५ एप्रिल २०२५ पासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी २० मे २०२६ पूर्वी आपला फार्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राज्यात एकूण १.७१ कोटी खातेदार असून त्यापैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी घेतला आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करणे आवश्यक आहे. यापुढे कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच बियाणे, खते, औषधे आदी कृषी निविष्ठा मिळविण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक राहणार आहे. नोंदणीसाठी शेतकरी आपल्या जवळच्या सेवा सुविधा केंद्रावर भेट देऊ शकतात किंवा ॲग्रीस्टॅक पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज करू शकतात. नोंदणी संदर्भात काही अडचण आल्यास शीतल कौदरे मो. ९१७२३१९६३७ यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## उष्माघाताचा धोका वाढला असून, नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी - आ.डॉ.गुट्टे

### अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे आवाहन: पिंपळदरी येथे गोवर्धन चाटे यांचा उष्माघाताने मृत्यू

(अली चाऊस/ दै.धर्मयोध्दा)



**गंगाखेड -** सध्या राज्यासह मराठवाड्यात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता नागरिकांच्या आरोग्यासाठी फार धोकादायक ठरत आहे. एप्रिल अखेरपासूनच तापमानाने उच्चांक गाठण्यास सुरुवात केली असून, येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचा धोका वाढला असून, प्रत्येक नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

उष्माघात ही अत्यंत गंभीर अवस्था असून, शरीराचे तापमान अनियंत्रितपणे वाढल्याने मेंदू व इतर अवयवांवर परिणाम होऊ शकतो. विशेषतः दुपारी ११ ते ४ या कालावधीत उन्हाचा तीव्र प्रकोप जाणवत असल्याने या वेळेत बाहेर जाणे टाळावे, असे आरोग्य तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला तसेच दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींना याचा अधिक धोका असतो. त्यामुळे सर्वांनी विशेष काळजी घ्यावी, असेही आ.डॉ. गुट्टे यांनी स्पष्ट केले आहे.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, उष्माघाताची लक्षणे सुरुवातीला सौम्य वाटत असली तरी ती गंभीर स्वरूप धारण करू शकतात. अंगात अशक्तपणा येणे, डोके गरगरणे, मळमळ, त्वचा कोरडी पडणे, शरीराचे तापमान वाढणे, हृदयाचे ठोके वेगाने धडधडणे ही उष्माघाताची प्रमुख लक्षणे आहेत. ही लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय उपचार घेणे अत्यावश्यक असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून नमूद केले आहे.

राज्य शासन व आरोग्य विभागाने संयुक्तपणे नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. शक्यतो घराबाहेर पडताना डोक्यावर टोपी किंवा कापड ठेवावे, भरपूर पाणी किंवा लिंबूपाणी घेणे, हलके व सैल कपडे परिधान करणे, तसेच थेट उन्हात जास्त वेळ काम करणे टाळावे, याकडेही आ.डॉ. गुट्टे यांनी लक्ष वेधले आहे.

दरम्यान, तालुक्यातील मोजे. पिंपळदरी येथे शेतकरी गोवर्धन बाबुराव चाटे (वय ५१ वर्ष) यांना शेतामध्ये उष्माघाताचा त्रास झाला. मात्र, अहमदपूर येथे जिल्हा उपरुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेची जाणीव करून देणारी असून, नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेतली पाहिजे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी म्हटले आहे.

## अरुण मिरगे यांची सहाय्यक मुख्य व्यवस्थापक पदावर पदोन्नती



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**माजलगाव-** माजलगाव तालूक्यातील लवूळ येथील मूळ रहिवाशी अरुण मारुतीराव मिरगे यांची प्रमोशन ने पंढरपुर येथील एल आय सी कार्यालयाचे वरीष्ठ व्यवस्थापक म्हणून नियुक्ती झाली आहे अरुण यांचे वडील जिल्हा परीषद शाळेतून सेवा निवृत्त असून कोरोना काळात आई व वडीलाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता वयाच्या १९ व्या वर्षी त्यांना सहायक पदावर अंबेजोगाई येथे प्रथम नियुक्ती मिळाली त्या नंतर परभणी देगलूर जालना मेहकर सोलापूर पुणे व छ . संभाजीनगर येथे एल आय सी विवीध पदावर कार्य केले आहे माजलगावचे शिक्षक शाम मिरगे यांचे ते पुतणे आहेत अरुण मिरगे हे कथा लेखक व कवी असून अनेक वर्तमान पत्रातून त्यांचे लेख व कविता प्रकाशित झालेल्या आहेत त्यांचे पदोन्नती बाबात माजलगाव पत्रकार मित्र नगरसेवक शरद यादव युवा नेते संतोष काटकर तसेच प्रतिष्ठीत नागरीकांनी अभिनंदन केले आहे

## निम्न दुधना प्रकल्पातून सिंचनासाठी सोडले जाणार पाणी लाभ घेण्याचे आ.डॉ राहुल पाटील यांचे आवाहन



**परभणी -** आ.डॉ.राहुल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे निम्न दुधना प्रकल्पातून कालव्याद्वारे उन्हाळी हंगामातील सिंचनासाठी पाणी सोडले जात असून तिसरी पाणी पाळी पंधरा मे ला सुरू होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊसासह चारा पिकांची लागवड करावी असे आवाहन आ.डॉ. राहुल पाटील यांनी केले आहे.

निम्न दुधना प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात परभणी तालुक्याचा समावेश होतो. झरी, साडेगाव शिवारातून आलेल्या कालव्याद्वारे उन्हाळी हंगामासाठी पाणी दिले जाते. आमदार डॉ.राहुल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे यंदा उन्हाळी हंगामासाठी चार पाणी पाळीचे नियोजन करण्यात आले आहे, यापूर्वी १६ मार्च आणि १६ एप्रिलला पाणी सोडले होते,त्यानंतर आता तिसऱ्यांदा दिनांक १५ मे रोजी पाणी सोडले जाणार आहे. आपल्या भागात उसाचे क्षेत्र वाढावे यासाठी आमदार डॉ. राहुल पाटील हे सातत्याने प्रयत्न करत आहेत. या पाण्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड करावी, या सोबतच चारा पिके घ्यावीत, मे अखेरीस हळद पिकाची लागवड करता येऊ शकते त्यामुळे या सिंचनाचा लाभ हळद पिकाला देखील होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार डॉ राहुल पाटील यांनी केले आहे.

## श्वान टायसन चा विशेष सत्कार



**परभणी -** पोलीस दलातील श्वान टायसन याने नागपूर येथे झालेल्या ६९ व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात सुवर्णपदक मिळविल्याबद्दल त्याचे हैंडलर पोलीस हवालदार रामचंद्र जाधव, पोलिस अंमलदार सादेक पठाण यांचा गुरुवारी पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सहायक पोलीस अधीक्षक जीवन बेनिवाल, अपर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ उपस्थित होते.

## आयटीआय लोहा येथील कोट्यवधींच्या कामांमध्ये बोगसपणाचा आरोप; सखोल चौकशीची मागणी

### निकृष्ट बांधकाम, क्युरींगचा अभाव, सज्जा कोसळून कामगाराला अपंगत्व; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

(गजानन नाईक/ दै.धर्मयोध्दा)



**लोहा -** औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोहा येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा बोगसपणा व निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य तुळशीराम लुंगारे यांच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

या संदर्भात सादर करण्यात आलेल्या निवेदनानुसार, परिसरात सिमेंट रस्ता, संरक्षण भिंत, सुरक्षा रक्षक कक्ष, नाली बांधकाम तसेच वर्कशॉप बिल्डिंगची कामे सुरू आहेत. मात्र ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर ठिकाणी मागील सहा महिन्यांपासून बोअर (कुपनलिका) बंद असल्याने पाण्याअभावी क्युरींग न करता काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नव्याने तयार केलेल्या सिमेंट रस्त्याला ठिकठिकाणी तडे गेले असून मजबुतीकरण न करता थेट काँक्रीट टाकल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

तसेच वर्कशॉप बिल्डिंगच्या बांधकामादरम्यान सज्जा कोसळून एका मिस्त्रीला गंभीर दुखापत होऊन तो पूर्णतः अपंग झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे बांधकामाच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नाली बांधकामात वापरण्यात आलेल्या लहान पाईप्समुळे पाणी योग्य प्रकारे न वाहता अडथळा निर्माण होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या सर्व प्रकाराची जबाबदारी निश्चित करून शाखा अभियंता व संबंधित कंत्राटदारांची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा १ मे २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांना माहितीस्तव पाठविण्यात आली आहे. या प्रकरणामुळे लोहा परिसरात मोठी खळबळ उडाली असून प्रशासन आता काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## परभणी जिल्ह्यातील हरभरा खरेदी केंद्र सुरु करणे बाबत पणन मंत्री सकारात्मक, शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

**परभणी-** जिल्ह्यातील शासनाचे खरेदी केंद्रे पोर्टल बंद केल्याने बंद पडलेली असल्याने रब्बी हंगामातील हरभरा खरेदी प्रक्रिया बंद पडली आहे, ती खरेदी केंद्रे पुन्हा सुरू करण्यात यावीत अशी मागणी आ राजेश विटेकर यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांना भेटून केली, पणन मंत्री यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने, शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत

शासनाने खरेदीसाठीचे ऑनलाइन पोर्टल बंद केल्यामुळे नाफेडमार्फत सुरू असलेली हमीभाव खरेदी बंद करण्यात आली आहे अशी माहिती जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी दिली आहे.

परिणामी, हरभरा विक्रीसाठी जिल्हाभरातील सर्वच केंद्रांवर आलेल्या शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे यावर्षीचे शासनाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे, त्यामुळे ही केंद्रे बंद करण्यात आली असल्याचे समजते,

जिल्ह्यातील ४२८१ शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे पैकी फक्त १९३५ शेतकऱ्याच्या हरभऱ्याची खरेदी करण्यात आली, खरेदीची मुदत २९ एप्रिल पर्यंत असताना अचानकपणे २४ एप्रिल रोजी खरेदी केंद्रे बंद करण्यात आले, त्यामुळे हरभरा विक्री साठी आलेले हजारो शेतकरी वाहनाचा भुर्दंड सहन करत ४५ डिग्रीच्या उन्हात तळपतत खरेदी केंद्रे सुरू होण्याची वाट पहात थांबलेले आहेत, हे चित्र अत्यंत वेदनादायक आहे.

पोर्टल बंद करण्यात आल्याने उर्वरित २,३४६ नोंदणीकृत शेतकरी खरेदीपासून वंचित राहिले आहेत, शासनाने खरेदी प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच पोर्टल बंद केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची भीती निर्माण झाली आहे.

नोंदणीकृत शेतकऱ्याच्या हरभऱ्याची खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्रांना मुदतवाड देण्याबाबत केंद्र सरकार सोबत बोलणी करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी आ राजेश विटेकर यांनी आज पणन मंत्री जयकुमार रावल यांना भेटून केली, त्यांनी लवकरच ही केंद्रे सुरू करण्याबाबत केंद्र सरकार कडे बोलणी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हरभरा खरेदी बाबत आशा पल्लवीत झाल्या आहेत.

## महाबीजला ५० वर्ष पूर्ण ; सुवर्ण महोत्सवी वाटचालीत गुणवत्तापूर्ण बीजत्पादनाने शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती



**परभणी -** शेतकऱ्यांचे हक्काचे माहमंडळ अशी ओळख असलेल्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) ने आपल्या यशस्वी वाटचालीची ५० वर्ष पूर्ण केली आहेत. या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून परभणी येथील विभागीय व जिल्हा कार्यालयात २८ एप्रिल, २०२६ रोजी भव्य वर्धापन दिन सोहळा पार पडला. अर्ध्या शतकाचा हा प्रवास केवळ व्यवसायिक नसून तो शेतकऱ्यांच्या विश्वासाचा आणि प्रगतीचा प्रवास असल्याचे या सोहळ्यातून अधोरेखित झाले. तज्ञांचे मार्गदर्शन : तंत्रज्ञानाशी जोडली जाणार शेती कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. के. एस. बेग, संशोधन संचालक, व.ना.म.कृ. वि. परभणी यांनी आपल्या भाषणात बदलत्या हवामानानुसार बियाणे संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी शेतकऱ्यांना विविध पिकांच्या नवीन वाणांची माहिती देऊन बियाणे उत्पादनातून आर्थिक प्रगती कशी साधता येईल, याचे सखोल मार्गदर्शन केले. जिल्हा बियाणे प्रमाणीकरण अधिकारी शरद कदम यांनी जिल्हा बियाणे प्रमाणीकरण यंत्रणेच्या पारदर्शक कार्यप्रणालीबद्दल तसेच बियाणे पात्र होण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि आवश्यक कागदपत्रे जतन करण्याबाबत मार्गदर्शन केले. महाबीजचा सुवर्ण प्रवास : प्रगतीचा आढावा विभागीय व्यवस्थापक जे. आर. खोकड, महाबीज परभणी यांनी महाबीजच्या ५० वर्षांच्या कारकिर्दीतील कामकाजाचा उहापोह करत प्रगतीची माहिती दिली. बियाणे उत्पादन, विपणन, प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण यांसह जैविक खते, जैविक बुरशीनाशके, भाभा अनुसंधान केंद्र, मुंबई येथील तंत्रज्ञानावर आधारित उत्पादने, अतिसूक्ष्म निंबोळी पावडर, डिकम्पोझर, कर्बमापक किट याविषयी विस्तृत माहिती देण्यात आली. शेतकरी, कर्मचारी, कामगार, विक्रेते यांचा गौरव या ऐतिहासिक सोहळ्याचे औचित्य साधून उत्कृष्ट काम करणाऱ्या बियाणे उत्पादक शेतकऱ्यांचा, भागधारकांचा आणि यशस्वी विक्रेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण सन्मान करण्यात आला. तसेच महाबीजच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा व्यवस्थापक आर. एम. शेख यांनी महाबीजच्या स्थापनेपासूनच्या संघर्षाची आणि यशाची गाथा प्रस्तावनेत मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी क्षेत्र अधिकारी एफ. आर. आडे, व कनिष्ठ प्रक्रिया सहाय्यक दिपाली लोखंडे, यांनी केले, तर आभार कनिष्ठ प्रक्रिया सहाय्यक अरुणा एकाडे, यांनी मानले. यावेळी जेष्ठ भागधारक शेषेराव चापके (कातनेश्वर) आणि शेतकरी नेते हेमराज शिंदे (रावराजूर) यांनी महाबीजच्या बियाणे गुणवत्तेचे तसेच कामकाजाचे कौतुक केले. या कार्यक्रमास महाबीजचे बियाणे उत्पादक, शेतकरी, विक्रेते, भागधारक तसेच वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर ५० व्या वर्धापन दिन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## काकीनाडा-हिसार 'ट्रेन ऑन डिमांड' विशेष गाडीला मुदतवाढ



**परभणी -** उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने काकीनाडा टाउन ते हिसार दरम्यान मुदखेड-नांदेड-पूर्णा-बसमत-हिंगोली-वाशीम-अकोला मार्गे 'ट्रेन ऑन डिमांड' विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष गाडी २१ एप्रिलपासून सुरू करण्यात आली असून प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून तिच्या सेवेला २८ एप्रिल आणि १ मे रोजी मुदतवाढ देण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०७७१७ काकीनाडा टाउन-हिसार 'ट्रेन ऑन डिमांड' विशेष गाडी मंगळवार २८ एप्रिल रोजी काकीनाडा टाउन स्थानकावरून सकाळी ०५.४० वाजता सुटली असून ही गाडी नांदेड (२३.१०), पूर्णा (००.४०), बसमत (०१.१०), हिंगोली (०२.३५), वाशीम (०३.५५), अकोला (०५.४५) तसेच भुसावळ, वडोदरा, रतलाम आणि चित्तौडगड या प्रमुख स्थानकांमार्गे गुरुवारी दुपारी १३.४० वाजता हिसार येथे पोहोचणार आहे. परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक ०७७१८ हिसार-काकीनाडा टाउन 'ट्रेन ऑन डिमांड' विशेष गाडी शुक्रवार १ मे रोजी हिसार येथून दुपारी १४.१० वाजता सुटेल आणि रविवारी १२.३५ वाजता काकीनाडा टाउन येथे पोहोचेल. या विशेष गाडीत एकूण २४ डब्यांची रचना असणार असून त्यामध्ये एसी फर्स्ट क्लास, एसी २-टियर, एसी ३-टियर, स्लीपर क्लास, जनरल सेकंड क्लास तसेच एसएलआर डबे समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रवाशांना त्यांच्या सोयीप्रमाणे प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao